| MHSO070003392010 | नियमित दरखास्त क्र. २७/२०१० मधील निशाणी क्र. ७९ वरील आदेश<br>(पारीत दिनांक १७ एप्रिल २०२६) |
|---|---|

१.        वादीने प्रस्तुतचा अर्ज हा कब्जे वारंट बजावणीकरीता निशाणी क्र.७१ व ७२ वरील आदेशानुसार पुन्हा उपअधिक्षक, भुमीअभिलेख पंढरपूर यांचे कार्यालयातील मोजणीदार तसेच एक महिला व एक पुरुष पोलीस बंदोबस्त मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीने त्याचे म्हणणे निशाणी क्र.९१ वर दाखल केले आहे. दोन्ही पक्षांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२.        वादीचे थोडक्यात असे कथन आहे की प्रस्तुत प्रकरणात कब्जे वारंटच्या बजावणीकरीता निशाणी क्र.७२ नुसार उपअधिक्षक, भुमी अभिलेख पंढरपूर यांना बेलीफाच्या मदतीला मोजणीदार यांना हद्दीखुणा दर्शविण्यासाठी पाठवण्याबाबत आदेश झालेला आहे. त्याचप्रमाणे सदर कब्जे वारंटच्या बजावणीकरीता एक पुरुष पोलीस व एक महिला पोलीस बंदोबस्त मिळण्याकरीता निशाणी क्र.७१ अन्वये पोलीस निरीक्षक, तालुका पोलीस स्टेशन यांना आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार वादीने संबंधित पोलीस स्टेशनमध्ये  रु.६,५१२/- भत्ता भरलेला आहे. त्यानंतर वादी व बेलिफ यांनी पोलीस, मोजणीदार व पंच लोक हे दिनांक २३.०१.२०२६ रोजी दावा जमीनीत कब्जे वारंटची बजावणी करण्यासाठी गेले असता प्रतिवादींनी त्यांना दावा जमीनीत येण्यास हरकत अडथळा केला. त्यावेळी कोर्टाचा आदेश असल्याबाबत सांगितले असता प्रतिवादींनी त्यांना 'नोटीस न देता मोजायला का आला आम्ही मोजू देणार नाही' असे म्हणुन त्यांना अडथळा केला. त्यावेळी पोलीस कर्मचारी श्री. कर्चे याने वादीलाच दमदाटी केली व नोटीस न देता कशी मोजणी व कब्जा घेता असा दम दिला. प्रतिवादींनी सरकारी कामात अडथळा आणला म्हणुन प्रतिवादी विरुध्द केस दाखल करणे अपेक्षित होते, मात्र तसे न करता कब्जे वारंट कब्जा न देता परत पाठविण्यात आले. त्यामुळे वादीने पुन्हा कब्जे वारंट देऊन निशाणी क्र.७२ प्रमाणे उपअधिक्षक, भुमी अभिलेख पंढरपूर यांना बेलीफाच्या मदतीला मोजणीदार व निशाणी क्र.७१ नुसार पुर्वी

भरलेल्या भत्यामध्येच तालुका पोलीस स्टेशन यांना एक पुरुष पोलीस व एक महिला पोलीस बंदोबस्त मिळण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पृष्ट्यर्थ मा.सर्वोच्च न्यायालय यांचे **बरकत अली व इतर वि. बद्री नारायण (२००८) एस.सी.सी.आर.२८५** या न्यायनिवाड्यावर विश्वास दर्शविलेला आहे. या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दरखास्त प्रकरणात पहिली नोटीस बजावणी झाल्यावर त्याबबात कोणताही आक्षेप प्रतिवादीने नोंदवलेला नसेल तर दरखास्तीच्या नंतरच्या टप्पांमध्ये दावा मिळकत जप्त केल्यानंतर कोणत्याही प्रकारचे आक्षेप प्रतिवादीला नोंदविता येणार नाही. अशा प्रकारे आक्षेप नोंदविणे हे Constructive res-judicata च्या तत्वाप्रमाणे कायदेशिर नाही. जप्ती वारंट काढल्यानंतर कोणत्याही प्रकारचे आक्षेप नोंदवुन त्यावर सुनावणी होऊ शकत नाही.

४. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने निशाणी क्र. ९१ वर प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवुन सदर अर्ज हा खरा व कायदेशिर नाही असे कथन केले आहे. वादीने दाखल केलेला दावा हा चुकीचा आहे. दावा मिळकतीची मोजणी झालेली नाही व आवश्यक त्या व्यक्तीनां दाव्यामध्ये पक्षकार केलेले नाही. तसेच ज्या व्यक्तीना दाव्यात पक्षकार केलेले नाही त्यांच्या जमीनीमध्ये अतिक्रमण दाखवित असल्याने ते व्यक्ती कब्जेस हरकत अडथळा करत आहेत. दावा मिळकतीची पुन्हा मोजणी होऊन अतिक्रमण क्षेत्र मोजणी नकाशानुसार कायम होणे गरजेचे आहे. पुर्वी झालेल्या १३ मोजणीमध्ये मोजणीच्या कोणत्याही हद्दीखुणा नाहीत. दावा मिळकतीची सर्व्हे नंबरनुसार मोजणी होऊन अतिक्रमण क्षेत्र कब्जा देण्यापुर्वी मोजणी नकाशामध्ये दाखवण्यात यावे व त्यानुसार अतिक्रमण निघाल्यास प्रतिवादी हा कब्जा देण्यास तयार आहे. प्रतिवादीच्या मिळकतीत वादीचे अतिक्रमण नाही व प्रतिवादीचे नाव घेऊन दाव्यात समाविष्ठ नसणारा व्यक्ती नांमे मारुती पितांबर गाजरे याच्या जमीनीत अतिक्रमण करीत आहे. वादीचे कृत्य हे बेकायदेशिर आहे. त्यामुळे दावा मिळकतीची पुन्हा मोजणी होऊन अतिक्रमण क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने शासकीय कामकाजात अडथळा आणलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुतचे प्रकरण हे नियमित दिवाणी दावा क्र.६/२००४ मधील पारीत केलेल्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीकामी दाखल केलेले आहे. प्रस्तुत हुकुमनामा दिनांक २९.१२.२००९ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीना वारंवार प्रत्येक टप्प्यावर नोटीसा काढण्यात आलेल्या असुन दावा मिळकत ही जप्त करण्यात आलेली आहे. यापुर्वी देखील प्रतिवादीनी हुकुमनाम्यात नमुद केलेल्या निशाणी क्र.३६ वरील मोजणी नकाशाप्रमाणे ताबा देण्यास अडथळा निर्माण केलेला आहे. प्रतिवादीनी दाखल केलेले दिवाणी अपील क्र.२८/२०१६ हे दिनांक ०६.०८.२०१९ रोजी काढून टाकण्यात आलेले आहे. निशाणी क्र.७१ व ७२ वरील आदेशानुसार मोजणी नकाशा प्रमाणे वादीला ताबा देणेकामी बेलिफ, उपअधिक्षक, भुमीअभिलेख पंढरपूर यांचे कार्यालयातील मोजणीदार तसेच एक महिला व एक पुरुष पोलीस बंदोबस्त देण्याचे आदेश पारीत केलेले होते. त्याप्रमाणे निशाणी क्र.१४ वरील ताबा वारंट पुन्हा पाठविण्यात आले. यापुर्वी प्रतिवादीने ताबा देण्यास हरकत अडथळा केल्याने यावेळी पोलीस बंदोबस्त देण्यात आलेला होता. परंतु, संबंधित कामी हजर असलेल्या पोलीस कर्मचा–याने न्यायालयाचा आदेश पालन न करता प्रतिवादीना नोटीस न देता मोजणी करण्यास कसे आले याबाबत आक्षेप नोंदवुन बेलिफ आणि मोजणीदार यांना ताबा वारंटची अंमलबजावणी करु दिली नाही. निशाणी क्र.१४ वरील बेलिफ, मोजणीदार तसेच त्यावेळी पंच साक्षीदार, पोलीस कर्मचारी यांच्या समक्ष करण्यात आलेला पंचनामा याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या भावकीतील इतर लोक प्रत्यक्ष जागेवर गोळा करुन ताबा वारंटची अंमलबजावणी करण्यामध्ये अडथळा निर्माण केलेला आहे.

६. प्रतिवादीने त्याच्या म्हणण्यामध्ये उपस्थित केलेला आक्षेप हा या प्रकरणाच्या सध्याच्या टप्पावर टिकण्याजोगा नाही. वादीने सादर केलेला न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणात तंतोतंत लागु ठरतो. आक्षेप नोंदविण्यासाठी प्रतिवादीना यापुर्वी संधी देण्यात आलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण सन २०१० सालापासुन गेली १६ वर्षे प्रलंबित आहे. अपील सन २०१९ साली खारीज केल्यानंतर देखील प्रतिवादींना ०७ वर्षांचा कालावधी प्राप्त झालेला होता. परंतु, या कालावधीत मुळ दाव्यातील हुकुमनामा

रद्दबातल करण्याचा कोणताही आदेश उच्च न्यायालयाकडून प्रतिवादीनी प्राप्त केलेला नाही. सदर हुकुमनामा आजरोजी देखील अस्तित्वात आहे. सबब, हुकुमनाम्याच्या प्रभावी अंमलबजावणीकामी प्रतिवादीनी घेतलेला आक्षेप सद्यस्थितीला टिकणारा नाही. ताबा वारंटची अंमलबजावणी करण्याकामी प्रतिवादीनी हरकत अडथळा केल्याकामी वादीने दाखल केलेला अर्ज हा योग्य आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज (निशाणी क्र. ७९) मंजुर करण्यात येत आहे.

२. निशाणी क्र.१४ वरील ताबा वारंट अंमलबजावणीकामी पुन्हा पाठविण्यात यावे.

३. उपअधिक्षक, भुमीअभिलेख पंढरपूर यांनी निशाणी क्र.७२ वरील आदेशाप्रमाणे त्यांच्या कार्यालयातील एक मोजणीदार निशाणी क्र.१४ च्या अंमलबजावणीकामी न्यायालयीन बेलिफ यांच्या मदतीसाठी संबंधित जागेवर नेमावा आणि गट क्र.४१५, मौजे शेळवे, ता.पंढरपूर मधील निशाणी क्र.३६ वरील मोजणी नकाशानुसार अतिक्रमीत क्षेत्र मोजुन त्याचा ताबा वादी यांच्या ताब्यात देण्यासाठी नेमणुक करावी. पुर्वी याकामी मोजणीदार यांची नेमणुक केल्यानंतर भरलेल्या भत्यामध्येच काम पुर्ण करण्याचे आहे.

४. पोलीस निरीक्षक, तालुका पोलीस स्टेशन यांना आदेशित करण्यात येते की निशाणी क्र.१४ च्या वारंट बजावाणीकामी न्यायालयीन बेलिफ यांच्या मदतीसाठी एक महिला व एक पुरुष पोलीस कर्मचारी यांची नेमणुक करावी व पुर्वी याकामी पोलीस कर्मचा–यांची नेमणुक केल्यानंतर भरलेल्या भत्यामध्येच काम पुर्ण करण्याचे आहे.

५. नेमलेल्या पोलीस कर्मचा–यांना आदेशित करण्यात येते की गुजर रावसाहेब गाजरे व वसंत रावसाहेब गाजरे आणि यांच्यामार्फत कोणत्याही इसमाने ताबा वारंटची अंमलबजावणी करतेकामी बेलिफ व मोजणीदार यांच्या कामात हरकत अडथळा होणार नाही याची पुर्ण दक्षता घ्यायची आहे आणि न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी सक्तीने करण्याची आहे. आदेशाची अंमलबजावणी होताना कोणत्याही व्यक्तीने अडथळा केल्यास त्यावर कायदेशिर कारवाई करण्यात यावी.

६. लिपीकाने संबंधित कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा आणि सोबत प्रस्तुत आदेशाची प्रत आणि निशाणी क्र.७१ वरील आदेशाची प्रत तालुका पोलीस ठाणे व निशाणी क्र.७२ वरील आदेशाची प्रत उपअधिक्षक कार्यालय भुमी अभिलेख यांना पाठवावी.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.04.17 17:09:55 +0530

**(एस.एस.राऊळ)**

**दिनांक – १७.०४.२०२६.**

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**

**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 17.04.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 17.04.2026. |
| Order uploaded on | :- | 17.04.2026. |